# '...कशी सावरू मनाला ?'

'कशी आवरू हा ओघ, कशी सावरू मनाला ?'
अमेरिकेत राहून मराठी साहित्य वाचण्याची तहान ई-सकाळ, मिसळपाव, मनोगत या व अशा अनेक साईट्समुळेच काही प्रमाणात का होईना भागवता येते. तरीही...कुठली तरी एक उणीव मनाला बोचत राहते. भारतात सुटीसाठी येणाऱ्या मित्रवर्गाबरोबर काही पुस्तकांची यादी देण्यात येते. त्यामुळं मनाची बोचणी थोडी बोथट करता येते. माझं हे वाचनप्रेम माझ्या आई-बाबांच्या चांगल्याच परिचयाचं. त्यामुळं ड्रेस नाही घेतला तरी चालेल, पण लेकीसाठी वेगवेगळ्या पुस्तकांची खरेदी मात्र त्यांनी वेळोवेळी करून ठेवलेली असते. मग हा 'अमूल्य साठा' जमेल तसा माझ्या सुपूर्द केला जातो.

या वेळी खजिन्यातून बाहेर पडलेले कविता महाजन यांचं 'ग्रॅफिटी वॉल' हातात घेतलं आणि जस-जसं वाचत गेले, तस-तशी या लेखिकेच्या अधिकाधिक प्रेमात पडत गेले. कविता महाजन यांचं 'ब्र' आणि 'भिन्न' वाचल्यावरच त्यांची प्रचंड फॅन बनले. आता हा 'ग्रॅफिटी वॉल'चा लेखसंग्रह वाचून तर त्या भावनेवर शिक्कामोर्तबच झालं आहे. त्यांच्या कविताही मनाला अक्षरशः वेड लावतात.

एक काळ होता, जेव्हा मी व. पु. काळे यांच्या लेखनाच्या अशीच प्रेमात पडले होते. कुठलाही लेखक म्हटला, की त्याच्या लिखाणावर बरे-वाईट ताशेरे ओढले जातातच. वपुंचं थेट लिखाणही या चक्रातून सुटलं नसावं. याच थेट पण प्रामाणिक, हळव्या, काळजाला हेलावून टाकणाऱ्या त्यांच्या लिखाणाचा-विचारांचा मनावर चांगलाच पगडा होता. आपल्या मनात जे काही चाललं आहे, तेच नेमकं हे कसं लिहितात, हा भोळा प्रश्न मनाला पडत असे. विचारांच्या याच जवळकीतून मी वपुंशी संवाद साधायचा प्रयत्न करु लागले...माझ्या डायरीच्या माध्यमातून! अर्थात हा प्रयत्न फारसा सफल झाला नाही. आयुष्याच्या वेगवेगळ्या चक्रात अडकल्यावर हे सर्व मागंच पडत गेलं...

कविता महाजन यांचे 'ब्र' वाचल्यावर शब्दांची खरी धार समजली. जे पूर्वी काळाच्या ओघात आयुष्यातून निसटलं होते...ते पुन्हा आकार घेऊ पाहतंय अशी जाणीव झाली. 'ब्र' मधील प्रफुल्ला स्वतःमध्ये कुठंतरी वास करून आहे, याची जाणीव झाली. मनावर झालेल्या आघातांचे प्रकार जरी थोड्याफार प्रमाणात भिन्न असले, तरी त्यामुळं अस्ताव्यस्त झालेलं आयुष्य बरंचसं सारखंच. या संस्था, त्यांचे मूळ प्रश्न, आदिवासी स्त्रियांची घरी-दारी असलेली व झालेली अवस्था मेंदूला झिणझिण्या आणल्यावाचून राहात नाही. त्यातून उभा रहिलेला त्यांचा संघर्ष, त्यांची जिद्द, एकजूट आणि यातूनच निर्माण होणारी एक 'आशा' उद्याच्या 'किंचित' बऱ्या भवितव्याची! त्यांच्याकडूनही शिकण्यासारखं प्रचंडच. समाजाच्या रुढ समजुतींना धक्का देणारा कोणताही विचार व्यक्त झाल्यास

लढाई अटळच. अशा लढायांना दागिन्यासारखं अंगा-खांद्यावर घेणाऱ्या या स्त्रिया. 'ब्र' उच्चारण्याची ऊर्मी ही आतूनच यावी लागते. या ऊर्मीची सडेतोड ओळख लेखिकेनं या कादंबरीच्या माध्यमातून करून दिली आहे.

कविताजींचं 'भिन्न'. 'एड्स'सारख्या विषयाची मांडणी-हाताळणी. जेवढी तरल, तेवढीच रोखठोक! आयुष्याचं भविष्य अंध:कारात असल्याचं दिसत असतानाही, जीवनाचा शेवट डोळ्यांना दिसत असला, तरीही मनात तेवत राहते, ती जगण्याची ऊर्मी. हे सगळं वाचून मन विषण्ण होतं आणि वाटतं, आपल्याला सुखं बोचतात हेच खरे. कविताजींनी साकार केलेल्या व्यक्तिरेखांकडून एक प्रकारची संजीवनी मिळते. आपण एक 'स्त्री' आहोत, याबरोबरच एक संवेदनाक्षम व्यक्ती आहोत, याचा सार्थ अभिमान वाटायला लागतो. माझ्याही या वेगळ्या वाटेवरच्या प्रवासाला एक भिन्न पण ठाम दिशा मिळाते.

आता 'ग्रॅफिटी वॉल' वाचताना तर असं वाटायला लागलंय, की मी ओळखते या लेखिकेला, तिच्या विचारांना, सडेतोड वागण्याला, तिच्या जाणिवांना, तिच्या अस्तित्वाला-अस्मितेला, तिच्या समर्थ प्रतिभेला आणि तिच्या क्वचितच-पण जाणवणाऱ्या साशंक भयाला! खरं तर हे फारच थेट विधान झाले, पण मनापासून वाटतेय की नक्कीच ओळखते, समजते मी या भावनेला! निदान आज तरी! व्यक्ती ही बदलत असते...सरत्या काळानुसार...आणि तशीच बदलत जाते. अनुभवांची जोड जशी मिळत जाते, तसे आपल्या जाणिवांचे गाठोडे आणखीनच संपन्न होत जाते. अशीच कदाचित होईल मला माझीही ओळख. पण तोपर्यंत कविता महाजन या लेखिकेची एक 'डेडिकेटेड' वाचक म्हणून माझा माझ्याशीच झालेला परिचय, मला तेवढाच प्रिय आहे.

वर्षानुवर्षं मनाच्या तळागाळात रुतवलेल्या भावना-जाणीवा, या वाचनानंतर डोकं वर काढायला लागल्या आहेत. हे सगळंच निरर्थक नाहीये, हे पण समजायला लागलं आहे. निर्भिड होऊन ते विचार आपल्या अस्तित्वाचा भाग म्हणून मिरवायला शिकलं पाहिजे. प्रत्यंतराचा क्षण एकच असतो, आणि तो आज ना उद्या प्रत्येकाच्याच आयुष्यात येत असतो. आपला विचार कधी न कधी कोणीतरी 'आपलासा' करतो आणि मग आपला तोच विचार प्रवाही होतो. त्याला एक किंवा अनेक मनांचं घरही मिळतं आणि तो रुजतही जातो.

हे सगळं लिहावंसं वाटलं, तेसुध्दा या लेखिकेच्या लिखाणाने मनाला आणि मेंदूला हलवल्यामुळं, काहीसं डिवचल्यामुळं, विचारांना ढवळल्यामुळं! कविता महाजन यांच्या पुस्तकांचं रसग्रहण करणं वगैरे या लिखाणाचं उद्दिष्ट नक्कीच नव्हे. ते ज्याने-त्याने वाचावे आणि पहिजे ते, पहिजे तसे ग्रहण करावे. प्रत्येकाची आवड-निवड निराळी. आपण कोणास काय सांगावे? हे सगळं लिहिण्याचं कारण

एवढंच, की कविताजींच्या लिखाणानं माझ्या मनातील विचारांना नवी उभारी मिळाली. मरगळ नष्टं झाली. तुमच्याही मनात असे दडलेले पण व्यक्त करण्यासारखे नक्की काही असेल...

कविताजींच्या 'Do Disturb' या दारावरच्या पाटीचा आधार घेऊन, खरंच एखाद दिवशी त्यांना भेटेन असं म्हणतेय. त्या तर मला भेटलेल्या आहेतच. त्यांच्या लक्षणीय लिखाणातून ही भेट मनात नक्कीच ताजी राहील...येणारी अनेक वर्षं !!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**

(पूर्व-प्रकाशित - ई सकाळ.कॉम)